MERC

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.

दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६

ई-मेल :mercindia@merc.gov.in संकेतस्थळ : www.merc.gov.in / www.mercindia.org.in

जाहिरात क्र. ०५/२०१६-१७

## जाहीर सूचना

**प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. सिरिन प्रॉपर्टीज् प्रा. लि. च्या ऐरोली, ठाणे येथील माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आयटी/आयटीईएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) (पहिली सुधारणा) विनियम, २०१६ वर अभिप्राय मागविण्याबाबत.**

मे. सिरिन प्रॉपर्टीज प्रा. लि. हे प्लॉट क्र. ३, ऐरोली, कळवा ट्रान्स ठाणे क्रीक इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, जिल्हा ठाणे, येथील १९.३४ हेक्टर्सच्या अधिसूचित केलेल्या विशेष आर्थिक क्षेत्राचे (एसईझेड) विकासक आहेत आणि विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ नुसार त्या एसईझेड क्षेत्रामधील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्याकरिता वितरण यंत्रणेचे संचालन आणि देखभाल करण्यासाठी ते मानीव वितरण परवानाधारक आहेत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने, 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. सिरिन प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड (एसपीपीएल) यांना ऐरोली, ठाणे येथील माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी (आयटी/आयटीईएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१३', दिनांक २१ ऑगस्ट, २०१३ रोजी अधिसूचित केले आहेत.

दिनांक २३ नोव्हेंबर, २०१५ रोजी, मे. सिरिन प्रॉपर्टीज प्रा. लि. चे नाव माईंडस्पेस बिझनेस पार्क्स प्रा. लि. असे बदलण्यात आले आणि त्यानुसार कंपनी निबंधकांकडून नवीन विधीसंस्थापन प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले आहे. आयोगाने, दिनांक १६ मे, २०१६ च्या आदेशाने नावातील बदलास तत्वतः परवानगी दिली आहे.

आयोग त्यानुसार 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. सिरिन प्रॉपर्टीज् प्रायव्हेट लिमिटेड (एसपीपीएल) यांना ऐरोली, ठाणे येथील माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी (आयटी/आयटीईएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम २०१३, मध्ये नावात बदल करण्यासाठी मर्यादित सुधारणा करण्याचे प्रस्तावित करीत आहे. विनियमांतील सुधारणेचे प्रारुप आयोगाच्या www.mercindia.org.in / www.merc.gov.in या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे. या प्रारुप सुधारणा विनियमांवर अभिप्राय, सूचना किंवा हरकती इंग्रजी किंवा मराठीमध्ये, सहा (१+५) प्रतींमध्ये, कृपया आयोगाचे सचिव यांना, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४००००५. येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाने; किंवा ई-मेल; किंवा फॅक्स (फॅक्स : ०२२ - २२१६३९७६, ई-मेल : mercindia@merc.gov.in) द्वारा दि. ६ जुलै, २०१६ पर्यंत पाठविण्यात याव्यात. या दिनांकापर्यंत प्राप्त झालेल्या प्रतिक्रिया आयोगाकडून विचारात घेण्यात येतील.

**दिनांक : ६ जून, २०१६**

**ठिकाण : मुंबई**

**सचिव**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**